
क्र. १४७ पहिले वर्ष

# रविवारची उपासना

४ जून २०२३



## पवित्र त्रैक्याचा रविवार

### प्रस्तावना

आज ख्रिस्ताच्या पवित्र त्रैक्याचा सन्मान करण्यासाठी हा रविवार पाळत आहोत. प्रत्येक ख्रिस्ती श्रद्धावंत एकमेव परमेश्वर मानतो. पण हा एकमेव परमेश्वर येशूख्रिस्त देव पुत्रामध्ये, आपल्यासाठी प्रकट झाला आहे. हाच आमच्या सर्वांठायी सर्वत्र कार्यरत आहे.

ख्रिस्ती श्रद्धावंतांचे जीवन स्नान संस्कारापासून मरणापर्यंत पवित्र त्रैक्यातील तिघांनी भरलेले आहे. पिता, पुत्र व पवित्र आत्मा आपल्यामध्ये वास्तव्य करतात. तिघांमिळून एकच देह ख्रिस्ती श्रद्धेचा भाग आहे आणि ह्या त्रिवेणी संगमाने आजही ख्रिस्तसभा सेवाकार्य करीत आहे. पवित्र क्रूसाच्या प्रार्थनेच्या समारोपाच्या वेळी हे त्रैक्य आपल्या मुखात सतत असते. ह्या पवित्र त्रैक्याचे रहस्य आपणांस प्रगट व्हावे व सार्वकालिक वैभवाच्या आनंदात सहभागी व्हावे म्हणून ह्या पवित्र मिस्साबलीत प्रार्थना करूया.

### प्रास्ताविक प्रार्थना

**आपण प्रार्थना करूया**

हे सर्वसमर्थ बापा, आम्हाला सत्याचे दर्शन घडविण्यासाठी आपला पुत्र व आम्हाला पवित्र करण्यासाठी आपला पवित्र आत्मा तू आम्हामध्ये पाठवलास. त्याच्याद्वारे तुझ्या जीवनाचे दिव्य रहस्य आम्हाला कळून येते. तुझ्यावरील श्रध्दा प्रकट करुन व त्याप्रमाणे आचरण करुन, तुझी तीन व्यक्तीस्वरुप एक परमेश्वर म्हणून भक्ती करण्यास आम्हाला साहाय्य कर. ही प्रार्थना आम्ही, तुझ्याबरोबर पवित्र आत्म्याच्या ऐक्यात सर्वकाळ जिवंत राहणारा व राज्य करणारा, एकच परमेश्वर, तुझा पुत्र, आमचा प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्याद्वारे करतो.

**प्रभूशब्द विधी**

### पहिले वाचन

**निर्गम या पुस्तकातून घेतलेले वाचन ३४:४–६,८,९**

**''परमेश्वर, परमेश्वर, दयाळू आणि कृपाळू देव.''**

मोशेने सकाळीच उठून दोन दगडी पाट्या आपल्या हातात घेतल्या आणि परमेश्वराच्या आज्ञेप्रमाणे तो सिनाय पर्वतावर चढून गेला. तेव्हा परमेश्वर मेघातून उतरला आणि तेथे त्याच्यापाशी उभा राहिला. परमेश्वराने त्याच्यासमोरून जाताना अशी घोषणा केली : ''परमेश्वर, परमेश्वर, दयाळू आणि कृपाळू देव, मंदक्रोध, दयेचा व सत्याचा सागर.'' तेव्हा मोशेने त्वरा करून भूमीपर्यंत लवून नमन केले आणि तो म्हणाला, ''हे प्रभो, तुझी माझ्यावर कृपादृष्टी झाली असेल तर प्रभूने आमच्याबरोबर चालावे. ते लोक ताठ मानेचे आहेत खरे, तरी आमचा अन्याय आणि पाप ह्यांची क्षमा कर आणि आम्हांला आपले वतन समजून आमचा अंगीकार कर.''

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### प्रतिसाद स्तोत्र

**दानिएल ३:५२,५६**

प्रतिसाद : **सर्वकाळ तुझी स्तुती आणि प्रशंसा होणे योग्य आहे.**

१. हे प्रभो, आमच्या पूर्वजांच्या देवा, तू धन्य आहेस. सर्वकाळ तुझी स्तुती आणि प्रशंसा होणे योग्य आहे. तुझे वैभवशाली आणि पवित्र नाव धन्य. त्याची मोठी स्तुती आणि सर्वकाळ प्रशंसा होवो.

२. तुझ्या पवित्र वैभवाच्या मंदिरामध्ये तू धन्य. त्याची वाखाणणी होवो, त्याचे वैभव सर्वकाळ पसरो.

३. तुझ्या राज्याच सिंहासनारूढ असणाऱ्या, तू धन्य. तुझी वाखाणणी आणि सर्वकाळ प्रशंसा होवो.

४. गर्तेतही दृष्टी टाकणाऱ्या, तू धन्य. तुझी स्तुती आणि सर्वकाळ प्रशंसा होवो.

५. आकाशमंडलातील तू धन्य. सर्वकाळ तुझी गीते गाईले जावोत आणि प्रशंसा होवो.

### दुसरे वाचन

**पौलाचे करिंथकरांस दुसरे पत्र यातून घेतलेले वाचन १३:११–१३**

**''येशू ख्रिस्ताची कृपा, देवाची प्रीती आणि पवित्र आत्म्याची सहभागिता.''**

बंधुजनहो, मी आता इतकेच म्हणतो, तुमचे कल्याण असो, तुम्हांस पूर्णता लाभो, समाधान मिळो. तुम्ही एकचित्त व्हा, शांतीने राहा म्हणजे प्रीतीचा व शांतीचा देव तुम्हांसह राहील. पवित्र चुंबन घेऊन एकमेकांना नमस्कार करा. सर्व पवित्र जन तुम्हांला नमस्कार सांगतात.

प्रभू येशू ख्रिस्ताची कृपा, देवाची प्रीती आणि पवित्र आत्म्याची सहभागिता तुम्हा सर्वांसह असो.

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### जयघोष

**प्रकटी. १:८**

**आलेलुया, आलेलुया!**

प्रभू देव जो आहे, जो होता व जो येणार आहे, त्या पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा यांस गौरव असो.

**आलेलुया!**

### शुभवर्तमान

**संत योहानलिखित शुभवर्तमानातून घेतलेले वाचन ३:१६–१८**

**''देवाने त्याच्याद्वारे जगाचे तारण व्हावे म्हणून आपला पुत्र जगात पाठवला.''**

येशू निकदेमला म्हणाला, ''देवाने जगावर एवढी प्रीती केली की, त्याने आपल्या एकुलत्या एक पुत्र दिला, अशासाठी की, जो कोणी त्याच्यावर विश्वास ठेवतो त्याचा नाश होऊ नये तर त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त व्हावे. देवाने आपल्या पुत्राला जगाचा न्यायनिवाडा करण्यासाठी नव्हे, तर त्याच्याद्वारे जगाचे तारण व्हावे

म्हणून पाठवले. जो त्याच्यावर विश्वास ठेवतो त्याच्यावर न्यायनिवाड्याचा प्रसंग येत नाही. जो विश्वास ठेवत नाही त्याचा न्यायनिवाडा होऊन चुकला आहे, कारण त्याने देवाच्या एकुलत्या एक पुत्राच्या नावावर विश्वास ठेवला नाही.''

**प्रभूचे हे शुभवर्तमान**

## श्रध्दावंतांच्या प्रार्थना

**प्रास्ताविक**

माझ्या बंधुभगिनींनो, आमच्या तारणाचे रहस्य साजरे करण्यासाठी ख्रिस्ताठायी आम्ही येथे एकत्र जमलो आहोत. जीवन आणि आशीर्वादाचा हा झरा अखिल जगाला खुला करण्यासाठी आपण आपल्या परमेश्वरपित्याकडे याचना करू या.

आपला प्रतिसाद असेल – **हे परमेश्वरा, दया कर, आणि आमच्या लोकांची प्रार्थना ऐक.**

१. ख्रिस्तसभेची समर्थपणे धुरा सांभाळणाऱ्या धर्मगुरू, धर्मभगिनी व धर्मबंधूंना परमेश्वराच्या दयेचा, प्रेमाचा व कृपेचा स्पर्श व्हावा, म्हणून आपण प्रभूकडे प्रार्थना करू या.

२. आपल्या कुटुंबात, गावामध्ये, समाजामध्ये शांती, प्रेम व ऐक्य सतत नांदत राहावे म्हणून आपण प्रभूकडे प्रार्थना करू या.

३. आपल्या प्रत्येकाच्या नोकरीधंद्यावर व शेतीवाडीतील कामावर परमेश्वराचा भरपूर आशीर्वाद असावा व आमचे जीवन बहरावे म्हणून आपण प्रभूकडे प्रार्थना करू या.

४. आपल्या युवक मित्रमंडळीला वेगवेगळ्या ऐहिक मोहपाशांशी मुकाबला करावा लागत आहे. त्या अग्निदिव्यातून जात असताना युवक-युवतींनी आपल्यामधील विकारांच्या अंधारावर मात करून विवेकबुद्धीच्या प्रकाशात मार्गक्रमण करीत राहावे, म्हणून आपण प्रभूकडे प्रार्थना करू या.

५. आपल्या कौटुंबिक व वैयक्तिक हेतूंसाठी, आपण प्रार्थना करूया.

## समारोप

हे सर्वसमर्थ पित्या, तुझ्या लोकांच्या प्रार्थना ऐक. तुझ्या प्रेरणेमुळे श्रध्देने आम्ही तुझ्याकडे प्रार्थना करतो. त्यांचा तू स्वीकार कर. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू ख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.

## अर्पणावरील प्रार्थना

हे प्रभो, आमच्या परमेश्वरा, ही दाने पवित्र कर आणि त्यांच्याद्वारे पूर्ण दान म्हणून आमचा स्वीकार कर. ही प्रार्थना आम्ही प्रभू येशूच्या नावाने करतो.

## प्रसादानंतर प्रार्थना

हे प्रभो परमेश्वरा, तीन व्यक्ती व एकमेव सनातन परमेश्वर म्हणून तुझी आम्ही उपासना करतो. आमची श्रध्दा व संस्कारस्वीकृती ह्यामुळे आम्हाला मानसिक व शारीरिक आरोग्य लाभावे म्हणून साहाय्य कर, ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो.

## चिंतन

प्रेम हा पवित्र त्रैक्याचा मुख्य गाभा होय. परमेश्वरपित्याने केवळ प्रेमापोटी मानवाला उत्पन्न केले. मानवावरील प्रेमापोटी त्याच्या पापांची क्षमा देण्यासाठी देवपुत्राने क्रूसावर आपले रक्त सांडले. प्रेम हे पवित्र आत्म्याचे प्रथम फळ आहे. संत ग्रेगरी म्हणतात, 'जुना करार हा देवपित्याचा काळ, नवा करार हा देवपुत्राचा काळ तर आधुनिक काळ हा पवित्र आत्म्याचा काळ आहे. ह्या तिन्ही त्रिकाळ परमेश्वराचे प्रेम अखंडितपणे वाहात आहे. आजची वाचने त्याच प्रेमाचे अनेकविध पैलू उलगडून सांगणारी आहेत.

**अ) प्रेम हे त्रैक्यस्वरूप परमेश्वराचे अंगभूत वैशिष्ट्य आहे :** खरं पाहता, मोशे परमेश्वराशी समोरासमोर कित्येकदा बोलला होता. त्यातून परमेश्वराला प्रथम डोळ्यांनी पाहण्याची इच्छा त्याच्या मनात निर्माण झाली. आजच्या पहिल्या वाचनात (निर्गम ३४:४ब ६, ८,९) परमेश्वर स्वत:चं रूप प्रकट करताना म्हणतो, ''परमेश्वर, परमेश्वर दयाळू व कृपाळू देव, मंदक्रोध, दयेचा व सत्याचा सागर.''

**ब) त्रैक्यस्वरूप परमेश्वरावर श्रध्दा ठेवणारा समुदाय प्रीतीत मुळावलेला असतो :** आजच्या दुसऱ्या वाचनात (२ करिंथ. १३:११-१३) संत पौल करिंथच्या लोकांना परस्परांशी प्रेमाने व शांतीने राहण्याचे आवाहन करतो. पवित्र त्रैक्यासाठी ज्यांचा बाप्तिस्मा झालेला आहे त्यांचा मिळून जो समुदाय बनतो तो देवाच्या प्रेमात, येशूच्या कृपेत आणि पवित्र आत्म्याच्या एकोप्यात वाढत राहावा अशी मनोकामना संत पौल व्यक्त करतो.

**क) प्रेम हे त्रैक्यस्वरूप परमेश्वराचे प्रभावी भावचिन्ह आहे :** शुभवर्तमानात (योहान ३:१६-१८) येशूच्या मुखातील सर्वात लोकप्रिय वचन देण्यात आलेले आहे. (देवाने जगावर एवढी प्रीती केली की,...''). मात्र देव हे प्रेम कोणावरही लादत नाही. ''जो त्याच्यावर श्रध्दा ठेवतो...'' ह्या शब्दांत मानवाचे व्यक्तिस्वातंत्र्य दडलेले आहे. श्रध्दा हा देवाच्या प्रेमाला दिलेला मनमोकळा प्रतिसाद असतो.

**आत्मपरीक्षण :** देवाच्या प्रेमाचा कोणता पैलू मी वारंवार अनुभवतो? कोणता पैलू अनुभवण्यात अडचणी आहेत?

●●●

| जून २०२३ | दैनंदिन बायबल वाचने | पहिला सप्ताह |
|---|---|---|
| सोम ०५ | सं बोनिफेस (तां) | : तोबीत १:१-२, २:१-८/मार्क १२:१-१२ |
| मंगळ ०६ | सं नॉर्बट (हि) | : तोबीत २:९-१४/मार्क १२:१३-१७ |
| बध ०७ | सन्माननीय थॉमस केंपिस (हि) | : तोबीत ३:१-१७/मार्क १२:१८-२७ |
| गुरू ०८ | येशूच्या शरीर व रक्ताचा सोहळा (पां) | : तोबीत ६:१०;७:१,९-१४;८;४-८/मार्क १२:२८-३४ |
| शुक्र ०९ | सं इफ्रेम (हि/पां) | : तोबीत ११:५-१५/मार्क १२:३५-३७ |
| शनि १० | सं जोकिम (तां) | : तोबीत १२:१,५-१५,२०/मार्क १२:३८-४४ |

**डॉन बॉस्को युथ सेंटर**
सलेशियन कॅटकॅटिकल सेंटर
४ कोरेगाव पार्क, पुणे ४११ ००१
मो. ९९७५९४०६७२

**त्या प्रकाशाविषयी साक्ष देण्याकरिता**
**(योहान १:८)**
चिंतन : फा. रॉबर्ट डिसोझा वसई
(खाजगी वितरणासाठी)